महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : cgmhrmsedcl@gmail.com
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - ६९४२५१४१

**क्र. मासंवि/रवका/न.क्र.६६४/ १०७७९** **दिनांक: २७.०३.२०२६**

प्रति,
मुख्य अभियंता,
म.रा.वि.वि.कं.मर्या.
सर्व परिमंडळ.

**विषय :** आदिवासी बहुल भागात कार्यरत असणारे अधिकारी व कर्मचारी यांना अनुज्ञेय असणाऱ्या सोयी सवलतींबाबत.

**संदर्भ:** १. प्रशासकीय परिपत्रक क्र.६९६ दि.२३.०७.२०२५.
२. शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण १०२५/प्र.क्र.१२२/२०२५/भाप्रसे-४ दि.१२.०८.२०२५.

*****

महाराष्ट्र शासनाच्या धर्तीवर प्रशासकीय परिपत्रक क्र.३७८ दि.२९.०१.२००३ अन्वये नक्षलग्रस्त तसेच आदिवासी बहुल भागांमध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता प्रोत्साहन भत्ता तसेच एकस्तर पदोन्नती व इतर सवलती अनुज्ञेय करण्यात आलेल्या आहेत. तद्नंतर प्रशासकीय परिपत्रक क्र.३५१ दि.३०.०८.२०११ अन्वये या क्षेत्रातील अधिकारी कर्मचारी यांना अनुज्ञाप्ती शुल्क देखील अनुज्ञेय करण्यात आलेले आहे.

२. महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचेकडून नक्षलग्रस्त भागांचा आढावा घेउन कोणकोणते जिल्हे, तालुके अथवा गांवे नक्षलग्रस्त भागात येतात याबाबतच्या निर्गमित करण्यात येतात. त्यानुसार कंपनी अंतर्गत शासनाने नक्षलग्रस्त भागांमध्ये वेळोवेळी केलेले बदल अंगिकृत करण्यात आलेले आहेत. तसेच शासनाने जाहीर केलेल्या सुधारीत नक्षलग्रस्त भागांमध्ये अनुज्ञेय असणारे प्रोत्साहन भत्ता, अनुज्ञाप्ती शुल्क व एकस्तर पदोन्नती इत्यादी लाभ/सवलती देण्यात येतात.

३. सद्यस्थितीत महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचा शासन निर्णय क्र.एनएएक्स १२२०/प्र.क्र.२५३विशा१ब दि.२७.०६.२०२५ अन्वये नव्याने नक्षलग्रस्त भाग घोषित केलेले आहेत. त्यानुसार यापूर्वी नक्षलग्रस्त भागांमध्ये समाविष्ट असणारे काही तालुके/गांवे वगळण्यात आलेली आहेत. याबाबतच्या सूचना प्रशासकीय परिपत्रक क्र.६९६ दि.२३.०७.२०२५ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तथापि, वगळण्यात आलेल्या भागांमध्ये उपरोक्त सोयी सवलती सुरू ठेवाव्यात की बंद कराव्यात याबाबत क्षेत्रिय कार्यालयांमध्ये संभ्रम असल्याचे निदर्शनास आले आहे.

४. तद्नंतर, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण १०२५/प्र.क्र.१२२/ २०२५/भाप्रसे-४ दि.१२.०८.२०२५ अन्वये "आदिवासी बहुल क्षेत्राकरीता अनुज्ञेय करण्यात आलेला एकस्तर पदोन्नतीच्या वेतन निश्चितीचा लाभ अबाधित राहील" अशा सूचना पारीत करण्यात आलेल्या आहेत. शासन परिपत्रक दि.१२.०८.२०२५ ची प्रत माहितीस्तव सोबत जोडली आहे.

५.	या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग यांचा शासन निर्णय क्र.टीएसपी/१०८६/१०८७/प्र.क्र.३१/क-५ दि.०९.०३.१९९० अन्वये तसेच वेळोवेळी आदिवासी उपायोजना क्षेत्र तथा आदिवासी बहुल भाग घोषीत केलेले आहेत आणि या क्षेत्रातील अधिकारी व कर्मचारी यांना उपरोक्त लाभ व सोयी सवलती अनुज्ञेय आहेत. यास्तव नक्षलग्रस्त क्षेत्रामधून वगळण्यात आलेले तालुके/गांवे यांचा समावेश आदिवासी बहुल भागात होत असल्यास फक्त अशा क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना अनुज्ञेय असणारे लाभ व सोयी सवलती अबाधित राहतील.

**सोबत:** शासन परिपत्रक दि.१२.०८.२०२५

**(भूषण कुलकर्णी)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(मासं)/(प्रकल्प)/(वाणिज्य) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (वित्त व लेखा)/(वितरण)/(पायाभूत आराखडा)/(विशेष प्रकल्प)/(मासं)/(सुवअं)/ म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण)/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**आदिवासी/ नक्षलग्रस्त भागात कार्यरत असणाऱ्या अ. भा. से. अधिकाऱ्यांना एकस्तर पदोन्नतीच्या वेतननिश्चितीचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबत तसेच गडचिरोली व गोंदीया जिल्ह्यातील अतिसंवेदनशील भागात कार्यरत असणाऱ्या अ. भा. से. अधिकाऱ्यांना दीडपट दराने वेतन व महागाई भत्ता अनुज्ञेय करण्याबाबत. राज्यातील सुधारित नक्षलग्रस्त क्षेत्र.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक:- क्रमांक संकीर्ण १०२५/ प्र. क्र. १२२/ २०२५/ भाप्रसे-४**
६२३ अ, सहावा मजला, विस्तार इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक:- १२ ऑगस्ट, २०२५.

वाचा:-

**१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण १०१६/ प्र. क्र. १४०/ २०१६/ दहा, दिनांक १३ जानेवारी, २०२३.**
**२) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक एनएएक्स १२२०/ प्र. क्र. २५३/ वि. शा. १ ब, दिनांक २७ जून, २०२५.**

**प्रस्तावना:-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण १०१६/ प्र. क्र. १४०/ २०१६/ दहा, दिनांक १३ जानेवारी, २०२३ अन्वये आदिवासी/ नक्षलग्रस्त भागात कार्यरत असलेल्या अखिल भारतीय सेवेतील (भा. प्र. से., भा. पो. से. आणि भा. व. से.) अधिकाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या संरचनेनुसार तसेच पुढील वेतन आयोगानुसार सुधारित होणाऱ्या नियमांनुसार एकस्तर पदोन्नतीच्या वेतन निश्चितीचा किंवा दीडपट वेतनाचा लाभ अनुज्ञेय करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

वरील लाभ गृह विभागामार्फत वेळोवेळी घोषित करण्यात येणाऱ्या नक्षलग्रस्त क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांच्या वेतनानुसार अनुज्ञेय करण्यात येतात. शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक एनएएक्स १२२०/ प्र. क्र. २५३/ वि. शा. १ ब, दिनांक २७ जून, २०२५ अन्वये राज्यातील संपूर्ण गडचिरोली जिल्हा आणि गोंदीया जिल्ह्यातील गोंदीया, सालेकसा, देवरी व अर्जूनी मोरगांव तालुके हे सुधारित नक्षलग्रस्त क्षेत्र घोषित करण्यात आले आहे.

**परिपत्रक:-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण १०१६/ प्र. क्र. १४०/ २०१६/ दहा, दिनांक १३ जानेवारी, २०२३ अन्वये नक्षलग्रस्त क्षेत्रासाठी अनुज्ञेय करण्यात आलेला एकस्तर पदोन्नतीच्या वेतन निश्चितीचा किंवा दीडपट वेतनाचा लाभ आता दिनांक २७ जून, २०२५ पासून पुढे केवळ गृह विभागाने घोषित केलेल्या सुधारित नक्षलग्रस्त क्षेत्रासाठीच अनुज्ञेय राहील.

२. तसेच, आदिवासी बहुल क्षेत्राकरीता अनुज्ञेय करण्यात आलेला एकस्तर पदोन्नतीच्या वेतन निश्चितीचा लाभ अबाधित राहील.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०८१२११५९०२७६०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नावाने,

ARCHANA JAGDISH TAMORE

Digitally signed by ARCHANA JAGDISH TAMORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=B89CC23BA64C2E257250277AA5FBFDC9F82CB978BC5E229E7598BBA40A61D487, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=61749DEAF7128E9D69EA5D23C7A15EEA58D13AD6EAF0FA0A656E1BBA62A15BD5, cn=ARCHANA JAGDISH TAMORE
Date: 2025.08.12 12:00:00 +05'30'

**(अर्चना तामोरे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त.
२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालये.
३. सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालये.

प्रत,

१. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अ. मु. स./ प्रधान सचिव/ सचिव, मा. मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे अ. मु. स./ प्रधान सचिव/ सचिव, मा. मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे अ. मु. स./ प्रधान सचिव/ सचिव, मा. मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मुख्य सचिव, मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
६. अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अप्पर मुख्य सचिव (गृह) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
८. अप्पर मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १ व २, मुंबई/ नागपूर.
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १ व २, मुंबई/ नागपूर.
११. अवर सचिव/ कक्ष अधिकारी (भापोसे आस्थापना), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. अवर सचिव/ कक्ष अधिकारी (भावसे आस्थापना) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. अवर सचिव/ कक्ष अधिकारी, कार्यासन भाप्रसे १ व भाप्रसे ३, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवडनस्ती.